महाराष्ट्र पोलीस दलातील पुरुष पोलीस अंमलदारांना "पीक कॅप" ऐवजी "फटीग कॅप" व महिला पोलीस अंमलदारांना "पीक कॅप" ऐवजी बॅरेट कॅप" पुरविण्यास मंजुरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : युएनएफ-०१९८/१२५८/३/पोल-४,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ०८ जुलै, २००२,

वाचा :- १) गृह विभाग शासन निर्णय क्र.युएनएफ-०१९८/१२५८/३/पोल-४, दि.५.१०.९८

२) गृह विभाग शासन निर्णय क्र.युएनएफ-१०९६/२८१४/१४/पोल-४, दि.११.९.९८

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१८/४९३७/ फटीग कॅप्स, दि.२०.११.२०००.

शासन निर्णय :- संदर्भाधीन अ.क्र.१ मधील दि.५.१०.९८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस अंमलदारांना "पीक कॅप" ऐवजी "फटीग कॅप" पुरविण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच संदर्भाधीन अ.क्र.२ मधील दि.११.९.९८ च्या शासन निर्णयान्वये महिला पोलीस अंमलदारांच्या गणवेषात बदल करण्यात आलेला असून त्यांना "पीक कॅप" पुरविण्याबाबतचा निर्णय देण्यात आलेला आहे. तथापि पीक कॅप वापरतांना/वापरल्यामुळे येणाऱ्या अडचणींबाबत अनेक पोलीस अमलदारांकडून तक्रारी प्राप्त झालेल्या असून पूर्वीप्रमाणेच "फटीग कॅप" पुरविण्याची मागणी त्यांनी केलेली आहे. त्यानुषंगाने मुख्यालय स्तरावरील राज्य पोलीस कर्मचारी वृंद परिषदेत सविस्तर चर्चा होवून "पीक कॅप" ऐवजी पूर्वीप्रमाणे "फटीग कॅप" वापरण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने पोलीस महासंचालक यांनी राज्य पोलीस दलातील पोलीस अंमलदारांना "पीक कॅप" ऐवजी पूर्वीप्रमाणेच "फटीग कॅप" पुरविण्याबाबतचा व महिला पोलीस अंमलदारांना पूर्वीप्रमाणेच "बॅरेट कॅप्स" पुरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.

२. उक्त पार्श्वभूमीवर पोलीस महासंचालक यांची शिफारस विचारात घेवून संदर्भाधीन अ.क्र.१ मधील दि.५.१०.९८ चा "पीक कॅप" पुरविण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे. तसेच संदर्भाधीन अ.क्र.२ मधील दि.११.९.९८ च्या शासन निर्णयामधील (केवळ) महिला पोलीस अंमलदारांना "पीक कॅप" पुरविण्याबाबतचे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

३.   आता चालू सन २००२-०३ पासून पुरुष पोलीस अंमलदारांना पूर्वीप्रमाणेच प्रत्येकी [illegible]साठी दोन "फटीग कॅप्स" (बृहन्मुंबई शहर पोलीस दलातील पोलीस अंमलदारांना पिवळया फितीसह व जिल्हा पोलीस दलातील पोलीस अंमलदारांना लाल फितीसह) पुरविण्यास, तसेच महिला पोलीस अंमलदारांना पूर्वीप्रमाणे जुन्या पध्दतीच्या "बॅरेट कॅप्स" पुरविण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी "फटीग कॅप्स" व "बॅरेट कॅप्स" ची खरेदी विहित पध्दतीने करण्यात यावी.

४.   यासाठी होणारा खर्च गृह विभाग मागणी क्र.बी-१, लेखाशीर्ष "२०५५-पोलीस, १०९ जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल (२०५५०१९८)" खालील चालू सन २००२-०३ च्या व पुढे प्रतिवर्षीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५.   हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ सीआर-३७८/२००२/व्यय-७, दि.३०.१.२००२ व अनौपचारिक संदर्भ क्र.सीआर-१८८/२००२/अर्थ-१०, दि.१५.२.२००२ ला अनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा.बा.घा.[illegible] २/७/०२

(रा. बा. घाडगे)

कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.

महालेखापाल,महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा),मुंबई.

अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.

निवासी लेखापरीक्षा अधिकारी,मुंबई.

वित्त विभाग (व्यय-७/अर्थसंकल्प-१०), मंत्रालय, मुंबई.

गृह विभाग (बीयुडी-१),मंत्रालय,मुंबई.

निवड नस्ती (पोल-४).